**कृपया प्रसिध्दीसाठी** **11 एप्रिल 2009**

## राम नाईक यांच्या स्वागतासाठी कमळ आणि गोविंदा

**मुंबई, शनिवार:** भाजपा नेते व उत्तर मुंबई लोकसभा मतदार संघातील भाजपा-शिवसेना युतीचे उमेदवार श्री. राम नाईक यांचे काल मालाड पश्चिम मध्ये गोविंदा पथक सलामी देत असताना नागरिकांनी कमलपुष्प देऊन जोरदार स्वागत केले. प्रचार फेरी की विजय मिरवणूक असा प्रश्न पडावा असा उत्साह प्रत्येक ठिकाणी दिसून येत होता.

'परिवर्तन रथा' वरुन श्री. राम नाईक, तर 'राम नाईक रथा' वरुन भाजपा-शिवसेना युतीचे स्थानिक नेते व कार्यकर्ते संपूर्ण उत्तर मुंबई पिंजून काढत आहेत. श्री. राम नाईक यांना विजयाची ग्वाही देण्यासाठी ठिक-ठिकाणी नागरिक स्वतःहून पुढे येऊन भेटत आहेत. मालाड पश्चिमेला काल उंदेराई रस्ता, सोमवार बाजार, लिबर्टी गार्डन, नेव्ही कॉलनी, नहार नगर, राम नगर, नडीयारवाला कॉलनी अशा ठिकाणी मोठया उत्साहाने श्री. राम नाईक यांचे स्वागत होत होते. या उत्साहाला उधाण आले ते श्री. राम नाईक चिंचोली बंदर रस्त्यावर पोहोचले तेव्हा श्री. राम नाईक येणार याची माहिती मिळाल्याने गोविंदा पथक तिथे त्यांच्या स्वागतासाठी हजर होते. कृष्ण जन्म नसताना 'रामा' च्या स्वागतासाठी गोविंदानी पाच थरी हंडी उभारुन श्री. राम नाईक यांना सलामी दिली. त्याचवेळी नागरिकांनी विजयाची ग्वाही देत एक भले मोठे कमळ ही भेट दिले. "जो लोकसेवेत तोच लोकसभेत हवा, तेव्हा तुम्हीच आमचे लोकसभेत प्रतिनिधित्व करणार," असे सांगायला आलेल्या सर्वांसह कार्यकर्त्यांच्या उत्साहालाही त्यामुळे यावेळी उधाण आले.

"मी गेली पाच वर्षे काय काम केले हे दरवर्षी कार्यवृत्त देऊन सांगितले आहे, या कामाच्या आधारावर मतं मागायला आलो होतो. महागाई, मंदी, बेरोजगारी बाजूला ठेवून स्वागत करताना जो उत्साह तुम्ही मतदारांनी दाखविला आहे. त्यामुळे तुम्ही विक्रमी मतदान कराल याचा विश्वास वाटतो," असे यावेळी श्री. राम नाईक म्हणाले.

शिवसेना उपविभागप्रमुख श्री. अशोक पटेल, माजी नगरसेवकद्वय श्री. मधुकर राऊळ व सौ. अनघा म्हात्रे, स्थानिक शिवसेना नेता श्री किरण किणी व सौ. गीता चाफेकर तसेच भाजपा-मुंबईचे उपाध्यक्ष श्री. जयप्रकाश ठाकुर व अन्य भाजपा नेते सर्वश्री गंगाराम जमनानी, सुरेश रावळ, राजेश सिंह, रमेश दोशी, हितेंद्र अटकर, महेश माणगावकर, नरेंद्र राठोड, आदी शेकडो कार्यकर्ता-नागरिकांसह प्रचारात सामील झाले होते.

**(विनोद शेलार)**
**प्रसिध्दी प्रमुख**
**भ्रमणध्वनी 9867689540**